# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०१४ अंतीम निकाल
## विनामूल्य प्रसिद्धी देण्याचे निवेदन

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१४ (MAHATET 2014) परीक्षेचा अंतरिम निकाल यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आला होता. आता सदर शिक्षक पात्रता परीक्षेचा अंतीम निकाल व अंतीम गुणपत्रक परीक्षार्थींना दिनांक २४/०७/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजलेपासून परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in व www.mahatet.in या संकेतस्थळावर घोषित करणेत येत आहे. हा निकाल पहाण्यासाठी परीक्षार्थींनी संकेतस्थळावरील Result वर जाऊन बैठक क्रमांकाची नोंद केल्यानंतर परीक्षार्थीला स्वत:चा निकाल दिसेल. असे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे कळवितात. पात्र परीक्षार्थींना स्वतंत्रपणे अंतीम गुणपत्रक व पात्रता प्रमाणपत्र संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद मार्फत नंतर अदा करणेत येईल.

या परीक्षेस मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमाचे प्रविष्ठ परीक्षार्थी संख्या तसेच पात्र संख्या, शेकडा निकाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | पेपर क्रमांक | माध्यम | परीक्षेस बसलेले परीक्षार्थी संख्या | पात्र झालेले परीक्षार्थी | शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | I (इ. 1 ली ते इ. 5 वी) | मराठी | 2,26,094 | 2,550 | 1.13% |
| 2 | I (इ. 1 ली ते इ. 5 वी) | इंग्रजी | 3,760 | 13 | 0.35% |
| 3 | I (इ. 1 ली ते इ. 5 वी) | उर्दू | 16,002 | 0 | 0% |
| एकूण : | | | 2,45,856 | 2,563 | 1.04% |

| अ.क्र. | पेपर क्रमांक | माध्यम | परीक्षेस बसलेले परीक्षार्थी संख्या | पात्र झालेले परीक्षार्थी | शेकडा निकाल |
|---|---|---|---|---|---|
| 1 | II (इ. 6 वी ते इ. 8 वी) | मराठी | 1,32,748 | 6,974 | 5.25% |
| 2 | II (इ. 6 वी ते इ. 8 वी) | इंग्रजी | 4,539 | 48 | 1.05% |
| 3 | II (इ. 6 वी ते इ. 8 वी) | उर्दू | 5,584 | 10 | 0.17% |
| एकूण : | | | 1,42,871 | 7,032 | 4.92% |

Website : www.mscepune.in
Email Id : mscepune@gmail.com
Phone No. : 26123066/67

जा.क्र. मरापप/बापवि/२०१५/ ५५८३
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक : २४/०७/२०१५.

प्रति,

१) मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०००३२
२) मा. विभागीय प्रसिद्धी उपसंचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/कोकण
३) मा. संचालक, दूरदर्शन केंद्र, वरळी, मुंबई - ४०००३२
४) मा. संचालक, आकाशवाणी, मुंबई केंद्र, नवीन प्रसारण भवन, बॅकबे रेक्लेमेशन, आमदार निवासाजवळ, मुंबई - ४०००२०
५) मा. संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई/जळगांव/रत्नागिरी/सांगली/कोल्हापूर/सातारा/सोलापूर/नाशिक
६) सर्व जिल्हा प्रसिद्धी अधिकारी
७) मा. वृत्तपत्र संपादक

**विषय** : "महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०१४" अंतीम निकाल जाहिर करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक आरटीई - २०१३/प्र.क्र.९१/प्राशि-१, दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ अन्वये परिषदेच्या वतीने "महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा - २०१४" चे आयोजन दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी करण्यात आले होते. या परीक्षेचा अंतीम निकाल दिनांक २४/०७/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजलेपासून जाहिर करण्यात येत आहे.

सोबतच्या निवेदनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून आणि आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी प्रादेशिक बातम्यांचे वेळी **विनामूल्य** प्रसिद्धी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. खाजगी सचिव, मा. शालेय शिक्षण मंत्री, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
३) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
४) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
६) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे-३०.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :**

१) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, सर्व.